




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : १४८ ● पुणे ● मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313







# खडकवासला मंडल अध्यक्षपदी रुपेश घुले पाटील

● खडकवासला भाजपा मंडल पदाधिकारी निवडी

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

संघटन पर्व या भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक निवडणूकीतील निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये खडकवासला मतदारसंघातील धायरी शिवणे या मंडलाच्या अध्यक्षपदी खडकवासला प्रभाग अध्यक्ष श्री. रुपेश घुले पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या निवडीने त्यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. रुपेश घुले पाटील यांनी नांदेड, खडकवासला प्रभागामध्ये भारतीय जनता पार्टीचे चांगले काम केले आहे. गेली अनेक वर्षापासून या भागांमध्ये भारतीय जनता पार्टीचे ते अविरतपणे काम करत आहेत.

नांदेड गावचे माजी उपसरपंच म्हणून त्यांनी चांगली कामगिरी केली आहे.





गेल्या अनेक वर्षापासून खडकवासला प्रभाग अध्यक्ष म्हणून ते काम करत आहेत. लोकसभा विधानसभा या सर्व निवडणुकांमध्ये त्यांनी महायुतीसाठी चांगले परिश्रम घेतले पक्षाने त्यांना मोठी जबाबदारी दिली आहे.

नांदेड व नांदेड सिटी भागात अनेक विकासकामे झालीत.मी उपसरपंच असताना ड्रेनेज व इतर सर्व रस्त्याचे काँक्रेट करण व गावाचा झपाट्याने विकास करण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊनही पक्षाकडे व आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्यामार्फत विकास कामे राबवण्यात आली.

याशिवाय अनेक विविध उपक्रम ते सातत्याने राबवत आहेत.

पक्षविरहित ही त्यांचे असलेला जनसंपर्क व पक्षासाठी काम करण्याची जिद्द पाहता सर्वांनी त्यांची निवड केली.

आगामी काळामध्ये पुणे महानगरपालिका निवडणुकीची जबाबदारी ही त्यांच्यावर असणार आहे.

खडकवासला भाजप प्रभाग अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांचे घरी पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात पाटीलकी त्यांच्याकडे आली. पणजोबा एकनाथ घुले पाटील मुलखी पाटील म्हणून नांदेडगावचा कारभार पहात. आजोबा मार्तंड घुले पाटील सरपंच पोलीस पाटिल म्हणून कारभार पाहत होते व वडील आबासाहेब घुले पाटिल बिनविरोध 15 वर्षे नांदेडगाव चे उपसरपंच म्हणून काम करीत होते.त्यामुळे ह्यां भागात घुले पाटील यांची राजकीय प्रतिमा मोठी आहे. त्यांचा या भागावर चांगला प्रभाव आहे. ह्यामुळे भाजपाला फायदा नक्कीच होणार आहे.

घुले पाटील यांच्या निवडीबद्दल आमदार भीमराव अण्णा तापकीर, शहराध्यक्ष धीरज घाटे पक्षातील इतर सहकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

### खडकवासला मतदारसंघाच्या विकासासाठी प्रयत्न

**या निवडीबाबत त्यांच्याशी संवाद साधला असता गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून करत असलेल्या कामाचे पक्षाने फळ दिले. आगामी काळामध्ये महानगरपालिका निवडणुका व इतर संघटनात्मक दृष्टीने आवश्यक ते बदल करण्याकडे माझा कल राहील व या भागाचा विकास करण्यासाठी अधिक जबाबदारीने आम्ही काम करणार आहोत आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या नेतृत्वाखाली खडकवासल्याचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असणार आहे.माझ्यावर विश्वास ठेवून माझा सन्मान केला त्याबद्दल पक्षश्रेष्ठींचे मी आभार मानतो. आगामी काळामध्ये चांगली कामगिरी मी करून देण्याचा प्रयत्न नक्की करणार आहे.**

**- रुपेश घुले पाटील, मंडलाध्यक्ष खडकवासला भाजपा**

# मुंबई-पुणे महामार्गावर ट्रकच्या धडकेत पुण्यातील तिघांचा मृत्यू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई-पुणे महामार्गावरील खंडाळा परिसरात रविवारी रात्री भरधाव ट्रकने मोटारीला धडक दिली. त्यानंतर मोटार पुण्याकडे येणाऱ्या मोटारीवर आदळून झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलेसह तिघे जण पुण्यातील आहेत. अपघातात १४ जण जखमी झाले आहेत. अपघातानंतर पसार झालेल्या ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रिया सागर इंगुळकर (वय ३५, रा. टिळक रस्ता, १०४१, शुक्रवार पेठ), निलेश संजय लगड (वय ४२), श्राव्या निलेश लगड (वय १२, दोघे रा. गिरिजाशंकर अपार्टमेंट, सदाशिव पेठ) अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. याबाबत सागर पांडुरंग इंगुळकर (वय ४०) यांनी लोणावळा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अपघातात शरयू लगड, रुद्राक्ष लगड, अंशिका मोगल, आरव मोगल, अर्श लगड, अर्षित लगड, तसेच मुंबईकडे निघालेल्या मोटारीतील अश्विनी रमेश जाडकर (वय ४३), ओमकेश रमेश जाडकर (वय २३), सुमीत तुकाराम कदम (वय २४), पुष्कर लक्ष्मण शेळकंदे (वय २५), जिग्नेश रमेश जाडकर (वय १२), संजय नामदेव वाल्हेकर (वय ४२), विमल नामदेव वाल्हेकर (वय ६९, सर्व रा. भिवंडी, जि. ठाणे) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. लोणावळा शहर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांनी दिलेल्या माहितीनुसार, लगड आणि इंगुळकर हे नातेवाईक आहेत. ते कौटुंबिक कार्यक्रमानिमित्त परगावी गेले होते. रविवारी रात्री जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरुन ते मोटारीतून पुण्याकडे परतत होते. त्या वेळी मुंबईकडे भरधाव वेगात ट्रक निघाला होता. मुंबईकडे जाणाऱ्या मोटारीला भरधाव ट्रकने पाठीमागून धडक दिली. त्या वेळी मोटारचालकाचे नियंत्रण सुटले आणि मोटार पुण्याकडे येणाऱ्या मोटारीवर आदळली. अपघातात सागर इंगुळकर यांची पत्नी प्रिया, साडू निलेश लगड आणि त्यांची मुलगी श्राव्या गंभीर जखमी झाले. मुंबईकडे निघालेल्या मोटारीतील चालकासह सात जण जखमी झाले.






# लिंबू लोणचं

सृष्टीचे तत्त्व सांभाळा, नेहमीची येतो उन्हाळा. वर्षभरात तीन ऋतूंच्या तीन तऱ्हा सांभाळताना होणारा त्रास परिणामकारक आहे. ऋतूचक्रात झालेले बदल, तापमान वाढ, भयावह पाणीटंचाई, वणव्यांची नैसर्गिक मालिकाच सुरू आहे. यायोगे पावसाचं अनियमित वेळापत्रक, सूर्याची वाढती उष्णता, गायब झालेली गुलाबी थंडी याचा संमिश्र परिणाम हवामानावर, पिकांवर आणि आरोग्यावर दिसून येतोय. बदललेल्या हवामानाचा सर्वात जास्त फटका शेतीवर झाल्याने अन्नधान्याच्या कमतरतेसह दैनंदिन जीवन व्यवहाराची सगळी गणित फोल ठरताना दिसत आहेत. त्या त्या ऋतूतल्या भाज्या आणि फळांनी अंग टाकल्याने महागाईचा राक्षस डोक्यावर नाचतोय. वेळेवर न मिळणाऱ्या भाज्या, तर कधी वेळेआधीचं फळ निर्मिती यामुळे फळांच्या गोडी आणि चवीमध्ये तफावत जाणवतेय. एकंदरीत सर्वत्र परिस्थिती सारखी असल्याने, डोक काम करत नाहीए. एकीकडे दैनंदिन व्यवहारासाठी बाहेर पडणं गरजेचं असलं, तर दुसरीकडे रणरणत्या उन्हामुळे घराबाहेर पडणं मुश्किल होतय. अशावेळी काय बरं करावं माणसानं? आमच्यासारख्या गृहिणी घरातल्या घरात थंडावा निर्माण करणारे पदार्थ करण्याकडे वळतात. माझाही तोचं प्रयत्न असतो.

मे महिन्याआधीच मार्च, एप्रिल तापल्याने आमची डोकी तरी शांत राहतील का? थंड वगैरे करण्यासाठीच्या प्रयत्नात थंडा थंडा कूलकूल करत सुगरणींचे हात थकत नाहीत. थंडाई, आवळा, कोवळा, संत्री, मोसंबी, कोकम, कलिंगड, वाळा घरात वेगवेगळ्या प्रकारांची सरबराई चालू असताना सोबत वाळवणीतले पापड, कुरडई यांसारखे पदार्थ म्हणजे वर्षभराच्या बेगमीची बात बनते. या बेगमीवरून मागील कोरोनाचा काळ आठवला. आपलं जगणं मुश्किल करणाऱ्या या महामारीने नाड्या आवळल्या होत्या आपल्या. अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टीं मिळणं कठीण होतं. गृहिणींवर कामाचा अतिरिक्त भार, जोडीला चोवीस तास काम आणि आराम हराम अशी गत होती. पण त्यातही आपल्या गृहिणी हुशारचं म्हणायला हव्यात..! जमेल



तेवढी बचत करत सगळ्यांची भूक आणि क्षुधा भागवणाऱ्या गृहिणींचं खरे तर कौतुक व्हायला हवं. अशीचं एक गृहिणी म्हणजे मी ! म्हणजे काय? तेच तर सांगायचा प्रयत्न करतेय केव्हापासून... तर लिंब आणण्यासाठी यांना बाजारात पाठवलं असता, वीस रुपयाला दोन लिंब घेऊन आले हे... मी अवाक् झाले. महागाई, महागाई म्हणजे काय...! आताशा तोंडचं पाणी पळवलेल्या काही लिंबांनी आमचा त्यावेळचा कोरोना काळ सुखावह केला होता. त्या विषयीची एक रुद्र आठवण अजूनही मन लिंबोरं करून जाते. त्याचं असं झालं की...


नैसर्गिक देणगीसह मनाची श्रीमंती लाभलेले सारस्वत म्हणजे गोव्याचं समृद्ध साम्राज्य. मंडळी कथा गुंफत जाते गोव्याभोवती आणि हाती गवसतं लिंबू लोणचं ऐकायला थोडं अवघड आणि विचित्र वाटत असेल ना...! पण कथानकाची सुरुवातचं भल्या मोठ्या लिंबांनी होते. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात शांतादुर्गा, मल्लिकार्जुन जत्रेसाठी गोव्याला जाणं व्हायचं तसं ते त्या वर्षीही झालं होतं. फिरण्याचा भाग म्हणून देवळं, समुद्रकिनारे बघून झाले होते. मुंबईत येण्याच्या दोन दिवसाआधी पैंगिणच्या मोठ्या नणंदबाईंकडे गेलो होतो. त्यावेळी ताईंनी भेट स्वरूपात अननस, नारळ, पेरू कढीपत्त्याची पानं माझ्या पिशवीत भरली; परंतु कायम स्मरणात राहील अशी प्रेमस्वरूप भेटही दिली, म्हणजे निघताना ताईंनी दोन डझन लिंब...! अहो लिंब कसली प्रथम दर्शनी इडलिंबू वाटणारी, बाहेरून पिवळी, तर आतून केशरी रंगाची बॉन्साय जातीची भारतीय लिंब माझ्या ओंजळीत टाकली. पातळ सालीची ओंजळीत न मावणारी लिंब मनात भरली. या लिंबांच करायचं काय? हा प्रश्न नव्हता! मार्च-एप्रिल महिन्याचा उकाडा जाणवत असला तरी, शरीराचा दाह लिंबू सरबताने शमणारा नव्हता. म्हणजे केवळ सरबतासाठी ती वापरण्याचा वेडेपणा मी टाळणार होते... अग् काय एवढं गोळा करते आहेस, अहोंनी नेहमीप्रमाणे फटकारलं, माझा मेलीचा मोह सुटत नव्हता, शिवाय एवढी भलीमोठी, पातळ सालीची लिंब घरच्यांना दाखवायची हौस होतीच... यांच काहीही न ऐकता ताईंनी दिलेली भेट घेऊन आम्ही मुंबई गाठली. सोबत आणलेली लिंब एका अर्थाने पथ्यावरचं पडली होती.

लॉकडाऊन सुरू होण्याचा काळ तो. मुंबईत सर्वत्र रोगाचा संसर्ग वेगाने पसरत चाललेला. बाहेर पडायचं म्हणजे रोगाला निमंत्रण होतं. कोरोनाच्या पुढच्या टप्प्यात पैसा, घरसामान सगळ्याला आळा बसणार होता. जमेल तेवढी काटकसर करून महिला जेरीस येणार होत्या, तर कुटुंब वेठीस पडणार होत. त्याकाळी इतर गृहिणींसारखीचं माझ्यावरची जबाबदारी सुद्धा वाढली होती. सहा जणांचा घरपसारा सांभाळायचा म्हणजे जंग की लढाईचं म्हणा ना...! कधी आल्याचा अर्धा तुकडा जपून वापरला, तर कधी लसूण पाकळी कष्टाने जोपासली. कोथिंबिरीची एक काडी, भाज्यांचे देठ कसोशीने हाताळले. पाव चमचा तेलाच्या फोडणीत दोन वेळची आमटी रटरटवली. कमी साखरेचा बीन दुधाचा चहा रिचवला. भयंकर काटकसर केली. फक्कड बेत आखले. कौटुंबिक जेवणाचा आस्वाद सगळ्यांनी अनुभवला. त्यावेळच्या अखिल महिला वर्गाची अवस्था अगदी माझ्यासारखी होती. या पुढचं कथानक असं...... तर त्याचं असं झाल...! या गडबडीत मी लिंब विसरलेचं होते. म्हणजे पुरवून पुरवून वापरताना उरलेली पंधरा लिंब फ्रिजमध्ये शिल्लक होती. मग काय विचारता ती फुकट जाऊ नये म्हणून केला आटापिटा. लागले कामाला. लिंब जास्तचं पिकून रस सोडू लागली होती. डबा उघडताचं घमघमीत सुवास पसरला होता. लिंब स्वच्छ धुतली, पुसली आणि सालासकट लावली मिक्सरला. वरून मीठ, लाल तिखट, साखर घालून काढली तीची वरात... मिक्सरमध्ये अशी गरागरा फिरवली की बास्... झाली एकजीव आणि पुढील तीन महिन्यांसाठी माझा जीव लिंबासारखा केशरी होऊन भांड्यात पडला. घम्म केशरी रंगाचं लोणचं तयार झालं होतं.

गरगरीत, आंबट, तिखट, तुरट, मधाळ लिंब लोणचं हौशेने खाल्लं आणि सगळ्यांना खाऊ घातलं हे विशेष. एक किलो बरणीला आलेला प्रोफेशनल टच विचारूचं नका...! सासूबाई तर कौतुक करत सुटल्या होत्या, माझ्यासह लोणच्याचं. इथं सांगायचं एवढचं की, पडत्या काळात माणसाला माणसं भेटू शकली नव्हती तरी, निसर्गाने नेहमीच्या सेवावृत्तीनं त्याच्या ठायी असलेलं उदारपण निभावलं होतं. एक कोपरा लोणच्याचा भरल्या ताटाची शान वाढवतो हे खरं आहे. कारण हे लिंबू लोणचं ताटात तोंडी लावायला म्हणून, तीन महिने सोबत करत होतं आम्हाला. जीवाचं रान करून काटकसरतीच्या जोडीला विसावलेलं लिंबू लोणचं कायम स्मरणात राहील. आजच्या घडीला महागाईचा भस्मासूर वाढतोय. संकट काय घेऊन येतील? कुणाची सोबत घडवतील? कुणाला दूर लोटतील? कोण उपयोगाला येईल? काही सांगता यायचं नाही. कोरोना काळात सोबत करणारी लिंब आजच्या घडीला ऐन मार्च, एप्रिल महिन्यात महाग झाली असली तरी, अस्सल खवय्येगिरी करणाऱ्यांना काही फरक पडणार नाही.

# खडकवासला भाजपा ग्रामीण मंडल अध्यक्षपदी नवनाथ तागुंदे यांची फेरनिवड

## विधानसभा निवडणुकीतील चांगल्या कामगिरीचे फलित



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संघटन पर्व या मोहिमेअंतर्गत नवनियुक्त मंडलाच्या निवड प्रक्रिया नुकतीच पडली. त्यानंतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत.

त्यामध्ये खडकवासला ग्रामीण, हवेली पश्चिम मंडल अध्यक्षपदी नवनाथभाऊ तागुंदे यांची फेरनिवड झाली आहे.

पुणे जिल्हा सरचिटणीस वैशाली सणस यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

विधानसभा निवडणूक तसेच पक्षाच्या संघटनात्मक कार्यक्रमाच्या चांगल्या मांडणीचे व कामाचे फळ मिळाल्याची चर्चा त्यांच्या निवडीमुळे होत आहे..

आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली चांगलं काम त्यांनी केले.

मागील विधानसभेपेक्षा या विधानसभेमध्ये सरस कामगिरी त्यांच्याकडूनही झाली.

त्यामुळेच पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास त्याचीही ही पोचपावती म्हणावी लागेल.

आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूक या पार्श्वभूमीवर त्यांची निवड झाल्याने पक्षाकडूनही त्यांना भविष्यातही मोठी संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

नवनाथ तागुंदे हे पूर्वाश्रमीपासून भारतीय जनता पार्टीचे काम करत आहेत. अतिशय शांत व नम्र स्वभावाचे नेतृत्व ही ओळख आहे.

त्यामुळे त्यांचे असलेले वलय व व्यक्तिमत्व यामुळे जनतेशी कार्यकर्त्यां त्यांचे चांगले संबंध आहेत.

त्यांची पुन्हा पश्चिम हवेली मंडल, अर्थात खडकवासला ग्रामीण मंडल अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक अभिनंदन वर्षाव करण्यात येत आहे.

आगामी पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणूकीतही त्यांना संधी मिळायची शक्यता होत आहे.

त्यांच्या निवडीबद्दल त्यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, आ . भीमराव अण्णा तपकिरी यांचे आभार मानले आहेत.

### पक्ष वाढीसाठी व विकासासाठी प्रयत्न करणार



पक्ष देईल ती जबाबदारी निभावण्याचा प्रामाणिक प्रयत्न आजपर्यंत केला आहे. खडकवासला ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी आ. भीमरावअण्णा तापकीर यांच्या साथीने आश्वासक प्रयत्न केले जाणार आहेत. व भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांना एक चांगली ताकद संधी देण्याचा मी नक्की प्रयत्न करेन. माझ्यावर टाकलेल्या जबाबदारी बद्दल पुन्हा एकदा आभार मानतो.

**- नवनाथ तागुंदे, नूतन अध्यक्ष खडकवासला ग्रामीण मंडल**

# जन सुरक्षा विधेयकाच्या विरोधात आज निदर्शने

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्य सरकारने शहरी नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी 'विशेष जन सुरक्षा विधेयक' तयार केले आहे. मात्र , हे विधेयक जनतेच्या अभिव्यक्तीचे व अन्यायविरोधात संघटित होण्याचे अधिकार संपुष्टात आणत असल्याचा आरोप जन सुरक्षा विधेयक २०२४ विरोधी समितीने केला आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी दुपारी ३ वाजता मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करण्यात येणार आहेत. जन सुरक्षा विधेयकात बेकायदेशीर कृती व बेकायदेशीर संघटना याबाबतच्या व्याख्या अत्यंत ढोबळ ठेवण्यात आल्या आहेत. कोणते कृत्य बेकायदेशीर आहे आणि कोणती संघटना बेकायदा हे ठरविण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला आहे. विधेयकानुसार सरकारने बेकायदेशीर म्हणून घोषित केलेल्या संघटनेच्या सभासद व सहकाऱ्यांसाठी अनेक वर्षांचा कारावास व लाखो रुपयांचा दंड अशा तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्या अत्यंत चुकीच्या असल्याचे समितीचे म्हणणे आहे. दरम्यान, हे जन सुरक्षा विधेयक २०२४ रद्द करावे यासाठी जन सुरक्षा विधेयक २०२४ विरोधी समिती गठित करण्यात आली आहे.

# मंडल अध्यक्षपदी यशवंत लायगुडे यांची निवड

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

संघटन पर्व या भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक निवडीमध्ये पुणे शहराच्या मंडळाध्यक्षाच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये खडकवासला विधानसभा मतदारसंघातील वडगाव बुद्रुक धायरी या प्रभागाच्या अध्यक्षपदी यशवंत लायगुडे यांची निवड करण्यात आली आहे..

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयाकडून मंडलाध्यक्ष पदासाठी निवडी जाहीर करण्यात आले.

यशवंत लायगुडे यांच्यासारख्या युवा नेतृत्वावर विश्वास टाकून एक मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर भाजपाने सोपवली आहे.



माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांचे ते पुतणे आहेत. त्यामुळे त्यांना चांगला राजकीय वारसाही आहे. युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी चांगले काम केले आहे. याशिवाय सामाजिक क्षेत्रांमध्ये त्यांनी चांगले काम केले आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लायगुडेना मिळालेल्या जबाबदारीने मोठी संधी त्यांना मिळाली आहे. आ. भीमराव अण्णा तापकीर यांच्या नेतृत्वाखाली या भागाचे विकासासाठी ही प्रयत्न नक्कीच केली जातील.

पक्षाने दिलेल्या जबाबदारी बद्दल आभार मानत, पक्षाने दिलेल्या संधीचे सोने करून दाखवू असा विश्वास नूतन मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे. यांनी व्यक्त केला आहे.

# पाण्यासाठी मोठ्या जनआंदोलनाचा नऱ्हेकरांचा निर्धार !

- महिन्यात प्रश्न न सुटल्यास भूपेंद्र मोरे पुन्हा उपोषण करणार
- पाण्यासाठी स्वाक्षरी मोहीम ही राबवली जाणार!
- समस्त नऱ्हेकरांची पाणी बैठक संपन्न



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

गेल्या दहा वर्षापासून नऱ्हे भागातील नागरिकांच्या प्रचंड वैतागलेले आहेत. ह्या परिसरातील नागरिकांना वारंवार पाणी पुरवठ्याची समस्या निर्माण होत आहे. ह्या समस्येवर अद्यापपर्यंत तोडगा निघालेला नाही. एक महिन्यात हा प्रश्न न सुटल्यास आगामी काळामध्ये मोठा लढा उभारण्याचा निर्धार समस्त नऱ्हेकरांच्या बैठकीत घेण्यात आला .

"समस्त नऱ्हेकर" यांच्यावतीने सिल्व्हर पेटलस हॉल.नऱ्हे रोड येथे पाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीमध्ये पाण्यासंबंधी व विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

आजपर्यंत पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊनही आजही या भागाला टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो ही अतिशय निंदनीय बाब आहे.

शिवाय टँकर साठी ही मोठी कसरत करावी लागत आहे. हे हाल थांबवण्यासाठी मोठा लढा उभारण्याचा निर्धार यावेळी उपस्थित सोसायटीधारकांनी बोलून दाखवला.

समस्त नऱ्हेकरांच्या वतीने पाण्यासाठी नागरिकांची स्वाक्षरी मोहिमही असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

वाढलेले प्रचंड नागरिकीकरण पाहता पाणीही पुरेसे द्यायला हवे मात्र पुणे महानगरपालिका असो वा प्रशासन यांनी सातत्याने या मागणीकडे कानडोळा केला आहे.

या भागातील लोकप्रतिनिधींनीही याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे. यामुळे आगामी काळात मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी याप्रसंगी दिला आहे.

याबाबत प्रशासनाने लवकरात लवकर पाऊल उचलावे व पाणी प्रश्न सोडवावा असे आवाहन यावेळी उपस्थित नागरिकांनी केले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे, राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी, राजेश बोबडे ,भाले काका, हनुमंत भोंगणे , हरीश वैद्य, लतिफ शेख, सुरज दांगडे, पुष्पा पाटील,उज्वला पंढरपूरकर,गिरीजा मगर, शिल्पा पाटसकर, प्रकाश कनोज, रुपेश कांबळे यांच्यासह विविध सोसायटीतील पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

### भूपेंद्र मोरे पुन्हा उपोषणाच्या तयारीत!



**नऱ्हे भागातील प्रश्नासाठी धावणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेले सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी पाणी प्रश्न ची समस्या लवकर न सोडवल्यास पुन्हा उपोषणाचा इशारा दिला आहे. त्वरित हा पाणी प्रश्न सोडवा किमान एक महिन्याच्या आणि तोपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करावा असे अल्टीमेटम श्री भूपेंद्र मोरे यांनी पुणे महानगरपालिकेला दिला आहे. यापूर्वीही त्यांनी आमरण उपोषण केले होते. त्यावेळी उपोषण सोडवताना महानगरपालिका प्रशासनाने त्यांना काही गोष्टी बाबत लेखी हमीपत्र दिले होते. मात्र त्यातील काही मागण्या तशाच राहिल्याने मोरे यांनी पुन्हा उपोषणाचा इशारा दिला आहे. सर्वात जास्त टॅक्स देऊनही आम्हाला हक्काचं पाणी मिळत नसेल तर ह्या हक्कासाठी पुन्हा लढाई करीन आणि या भागातील जनतेला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न नक्की करणार आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते श्रीम भूपेंद्र मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.**

# थोडक्यात

## भूपेंद्र मोरे यांच्या वाढदिवसानिम्मित रक्तदान शिबिरास प्रतिसाद



**पुणे (आरंभ पर्व) : खडकवासला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते श्री भूपेंद्र मोरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त शिवराज्य समूहाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते . त्यास रक्तदात्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सध्या सर्वत्र रक्ताचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे हे जाणून शिवराज्य समूहाच्या वतीने रक्तदान शिबिर राबवण्यात आले. शिवराज्य समूहाच्या वतीने आतापर्यंत हजारो रक्त पिशव्या संकलित करून अनेक गरजूंना रक्तपुरवठा करण्यात आला आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे रक्त शरीरातच तयार होते . एक रकतदाता तीन लोकांचा जीव वाचू शकतो आपण सर्वांनी रक्तदान करणे गरजेचे आहे असे मत यावेळी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी व्यक्त केले. आज झालेल्या शिबिरामध्ये 145 रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या. यावेळी राजेभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी, हरीश वैद्य, प्रशीक दारुंडे,लतीफ शेख, सुरज दांगडे , विशाल खरात, सुनील पढेर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक व रक्तदाते उपस्थित होते. शिवराज्य समूहाच्या वतीने सर्व रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला.**



## रक्तदान शिबिर संपन्न

**बार्शी(आरंभ पर्व) : बार्शी तालुक्यातील हिंगणी (पा) येथे स्वराज्य ग्रुप व चेतक क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या वतीने हे शिबिर आयोजित करण्यात आले त्यास ह्यामध्ये प्रत्येक समाजाचा व्यक्तीकडून रक्तदान करण्यात आले. छत्रपती संभाजी महाराज हे औरंगजेबाचा कैदेत असताना त्यांचे अंगरक्षक रायप्पा महार यांनी काही मोजक्या मावळ्या सह संभाजी महाराजांना कैदेतून सोडवण्याचा वीर मरण प्रयत्न केला. इतिहास आपल्याला शिकवतो की जाती धर्म व उच्च_नीच ही भावना समजला कीड निर्माण करते. कारण "स्वराज्य" या गोष्टी न मानता. रयतेसाठी आखलेला विश्वास होता. हे कार्य वर्षांवर्ष असच सुरू राहील... व सत्य,संघर्ष,संयम व समानता...हिंगणी(पा) या गावात राहील.. असा विचार यावेळी उपस्थित कार्यकत्यांनी बोलून दाखवला..यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ व सर्व समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.**

## खडकवासला नूतन मंडलाध्यक्षांचा आ. तापकीर यांच्या हस्ते सत्कार



**खडकवासला (आरंभ पर्व) : खडकवासला विधानसभा मतदारसंघातील संघटन पर्व ह्या मोहिमेअंतर्गत नवीन मंडल अध्यक्ष निवडी पार पडल्या. त्यातील खडकवासला ग्रामीण मंडलाध्यक्षपदी नवनाथ तागुंदे धायरी वडगाव बुद्रुक मंडलाध्यक्ष म्हणून यशवंत नायगुडे, धायरी शिवणे रुपेश घुले यांच्या नुकत्याच निवडी करण्यात आल्या. भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव पारगे यांच्या डोंणजे येथील जनसंपर्क कार्यालयामध्ये नुतन मंडलाध्यक्षांचा सन्माz करण्यात आला. खडकवासल्याचे लोकप्रिय आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या हस्ते नूतन अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आ.तापकीर यांनी नूतन अध्यक्षांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. खडकवासला मतदारसंघातील तळागाळातील प्रश्न व कार्यकर्त्यांची असलेला हा संवाद असाच ठेवून खडकवासल्याचा सर्वांनी विकास करण्याचे धोरण आपण अवलंबूया. तुमच्या पाठीशी आम्ही सदैव असणार आहे असा विश्वासही त्यावेळी त्यांनी व्यक्त केला. यावेळी उपस्थित अध्यक्षांनी आभार मानत आपल्याला दिलेली जबाबदारी अधिक जबाबदारीने काम करणार असल्याचे सांगितले.यावेळी अध्यक्ष दिव्यांग विकास आघाडी भाजप पाश्चिम महाराष्ट्र बाजीराव पारगे ,सचिन भाऊ पायगुडे, विठ्ठल ठाकर नंदूशेठ जावळकर, दत्ताभाऊ पायगुडे, सुनील मांढरे,राजूभामे, दत्ता डबडे, राजाराम मातळे, शिवाजी लायगुडे, तसेच भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## थोडक्यात



### इंडियन ऑइलच्या एक्सट्रापॉवर फ्लीट कार्ड लॉयल्टी प्रोग्रामला पुरस्कार प्रदान

मुंबई (आरंभ पर्व) : इंडियन ऑइलच्या फ्लॅगशिप एक्सट्रा पॉवर फ्लीट कार्ड लॉयल्टी प्रोग्रामला डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अंतर्गत बिझनेस प्रोसेस ट्रान्सफॉर्मेशन या विभागातील स्कॉच(SKOCH) गोल्ड पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला आहे. 100व्या स्कॉच समिट दरम्यान हा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार इंडियनऑइलच्या नवकल्पना व ग्राहक-केंद्रित डिजिटल उपायांमधील सातत्यपूर्ण प्रयत्नांना मान्यता देतो, विशेषतः परिवहन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी. या प्रोग्राममुळे फ्लीट ऑपरेटर्ससाठी इंधन व्यवस्थापन एक सुरक्षित, सुलभ आणि तंत्रज्ञान-सक्षम प्लॅटफॉर्मद्वारे रूपांतरित झाले आहे. स्कॉच डेव्हलपमेंट फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. समीर कोचर यांच्या हस्ते हा पुरस्कार इंडियनऑइलच्या टीमने स्वीकारला. स्कॉच पुरस्कार हे भारतातील सर्वात प्रतिष्ठित पुरस्कारांपैकी एक आहेत. हे प्रशासन, अर्थ, तंत्रज्ञान आणि सामाजिक परिणाम यामधील उत्कृष्टतेचा गौरव करतात. इंडियनऑइलची निवड एक काटेकोर बहुपर्यायी मूल्यांकन प्रक्रियेनंतर झाली, ज्याचा शेवट 11 मार्च 2025 रोजी झालेल्या अंतिम सादरीकरणाने झाला. यंदाच्या पुरस्कारांमध्ये बँका, सरकारी संस्था, तंत्रज्ञान कंपन्या आणि खासगी क्षेत्रातील आघाडीच्या संस्थांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता. एक्सट्रापॉवर फ्लीट कार्ड प्रोग्राम देशभरातील लाखो फ्लीट ऑपरेटर्ससाठी एक विश्वासार्ह उपाय ठरला आहे. तो रिअल-टाइम नियंत्रण, पारदर्शकता आणि मूल्यवर्धित सुविधा देतो, जे इंधन खरेदी आणि कामकाज अधिक सुलभ करतात.

### बुधवारी होणार सरपंच आरक्षण सोडत

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत बुधवारी (दि. २३) काढण्यात येणार आहे. पंचायत समितीच्या सभागृहात दुपारी बारा वाजता ही सोडत काढण्यात येणार आहे. अशी माहीती प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी दिली. पाच वर्षांपूर्वी तात्कालीन तहसीलदार डॉ. वैशाली वाघमारे यांच्या उपस्थितीत ८ ऑक्टोबर २०२० रोजी खेड तालुक्यातील १६२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांची आरक्षण सोडत झाली होती. हे आरक्षण रद्द होऊन पुन्हा २० जानेवारी २०२१ मध्ये फेरआरक्षण सोडत काढून अंतिम करण्यात आली होती. या आरक्षण सोडतीमध्ये ६० टक्के महिलांना सरपंचपदाची संधी मिळाली होती. तात्कालीन महाविकास आघाडी सरकारने लोकनियुक्त सरपंचपदाची निवडणूक पद्धती रद्द करून सदस्यांमधून सरपंच निवडणूक घेण्यास सुरुवात केली होती. नंतर शिवसेनाफुटीनंतर महायुतीचे सरकार येताच पुन्हा लोकनियुक्त सरपंच निवडणूक अंमलबजावणी करण्यात आली.

# ईमामी सादर करीत आहे 'प्योर ग्लो'

## त्वचेची काळजी होणारे एक क्रांतिकारी समाधान : ब्रँड ॲम्बॅसेडर म्हणून राशी खन्नाला आणण्यात आले आहे



**कोलकाता (दै. आरंभ पर्व)**

ईमामी लिमिटेड, ईमामी ग्रुपची प्रमुख पर्सनल केअर आणि हेल्थकेअर कंपनी ईमामी लिमिटेडने ईमामी प्योर ग्लो सादर करुन ₹4000 कोटिपेक्षा जास्त उलाढालीच्या ब्राइटनिंग क्रीम कॅटेगरीत प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. ग्राहकांच्या प्रमुख चिंता दूर करण्यासाठी आणि ग्लो सेग्मेंटची पुर्नपरिभाषा करण्यासाठी डिजाइन केलेले एक क्रांतिकारी स्किनकेअर सोल्युशन.

ब्रँडचे आकर्षण वाढविण्यासाठी आणि देशभरातील ग्राहकांशी जोडण्यासाठी, ईमामीने प्योर ग्लोचा चेहरा म्हणून राशी खन्नाला निवडले आहे. प्रादेशिक आणि हिंदी चित्रपट उद्योगात मजबूत उपस्थिती असलेली राशी खन्ना, ब्रँडमध्ये आकर्षण, आत्मविश्वास आणि सापेक्षता आणते, ज्यामुळे ती नवीन काळातील स्किनकेअर क्रांतिसाठी परिपूर्ण बनते.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे, ईमामी प्योर ग्लो हे महिलांना भेडसावणाऱ्या सर्वात मोठ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार केले आहे, जे सध्याचे ब्राइटनिंग क्रीम्स वापरतात - जसे, पांढरा थर, मॉइश्चरायझेशनचा अभाव आणि कमीत कमीत प्रभावीपणा किंवा कालांतराने न दिसणारे परिणाम. पर्सनल केअर सेग्मेंटमध्ये त्याच्या अभूतपूर्व नवकल्पनांसाठी ओळखल्या जाणाऱ्या ईमामीने विज्ञान आणि निसर्गाची शक्ति एकत्र केली आहे. पुढच्या पिढीतील ब्राइटनिंग क्रीममध्ये जापानी सकुरा फुलाचे प्रभावी गुणधर्म आणि वैद्यकीय दृष्ट्या सिद्ध झालेले नियासिनमाइड मिसळून. हा अद्वितीय फॉरम्यूला फक्त 3 आठवड्यात दिसून येणारी चमक देतो, 50% जास्त मॉइश्चरायझेशन देतो आणि फक्त एका आठवड्यात काळे डाग कमी करण्यास मदत करतो.

लॉन्चच्या प्रसंगी बोलताना, श्री मोहन गोएन्का, व्हाइस चेअरमन आणि होल-टाइम डायरेक्टर, ईमामी लिमिटेड म्हणाले, "ईमामीने बऱ्याच वर्षांपासून नाविन्यपूर्ण आणि उच्च कार्यक्षमता असलेल्या उत्पादनांसह पर्सनल केअर कॅटेगरीमध्ये व्यत्यय आणला आहे.

प्योर ग्लोसोबत, आम्ही एका प्रभावी उच्चतम, वैज्ञानिक फॉर्म्युलासह ₹4000 कोटिच्या ब्राइटनिंग क्रीमच्या बाजारात प्रवेश करीत आहोत. आम्ही ग्राहकांच्या चिंतांचा सखोल अभ्यास केला आहे आणि आमची अद्वितीय 6-मार्गी ब्राइटनिंग ॲक्शन, डीप पेनिट्रेशन टेक्नॉलॉजी आणि नैसर्गिक घटक एक प्रभावी, दीर्घकाळ टिकणारी चमक सुनिश्चित करते. आम्हाला विश्वास आहे की प्योर ग्लो ह्या श्रेणीत एका नव्या युगाचा प्रारंभ करेल."

प्रादेशिक आणि हिंदी चित्रपट उद्योगातील आशादायक नाव आणि ईमामी प्योर ग्लोची ब्रँड ॲम्बॅसेडर राशी खन्ना ही ब्रँडशी तिच्या संबंधाबद्दल म्हंणते "ईमामी प्योर ग्लोशी जोडले गेल्याचा मला खूपच आनंद आहे! मला खरोखरच असे वाटते की स्किनकेअरने विज्ञानावर आधारित राहून नैसर्गिक सौंदर्य साजरे केले पाहिजे, ज्यामुळे ते अधिक खास बनते. या उत्पादनात निसर्ग आणि नाविन्याचा एक अद्भूत मेळ आहे आणि मला याचा मऊ-हल्केपणा, त्वरित ॲब्जॉर्बशन आणि कोणत्याही पांढऱ्या थरा शिवाय त्वचेत ताजेपणा आणि चमक आणण्याचा गुणधर्म अतिशय आवडतो. आत्मविश्वासाने सहजतेने चमकू इच्छिणाऱ्या प्रत्येक महिलेसाठी हे परिपूर्ण आहे."

दक्षिण भारत आणि मुंबई आणि दिल्ली सारख्या मेट्रो शहरांमध्ये प्रचंड चाहते आणि मजबूत संपर्कासह, राशी खन्ना ब्रँडमध्ये एक तरुण, महत्त्वाकांशी चेहरा जोडते, ज्यामुळे ते आजच्या ग्राहकांसाठी एक लोकप्रिय पर्याय बनते.

## बाबासाहेब ज्ञानाचे, तर रमाई त्यागाचे प्रतीक : हर्षवर्धन सपकाळ

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

"भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचे, तर रमाई आंबेडकर त्यागाचे प्रतीक आहेत. रमाईंच्या त्यागाची साथ मिळाल्याने बाबासाहेबांना संविधान लिहिण्यासह अनेक गोष्टींमध्ये भरीव योगदान देता आले. बाबासाहेबांचे संविधान आणि रमाईचा त्याग यातून प्रेरणा घेत महाराष्ट्रात पुन्हा एकदा संविधानाला अभिप्रेत सरकार आणण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करावे," असे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. पुणे स्टेशन येथील महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाला हर्षवर्धन सपकाळ यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. यावेळी पुणे महानगरपालिकेतील माजी विरोधी पक्षनेते ॲड. अविनाश साळवे यांच्या हस्ते हर्षवर्धन सपकाळ यांचा सन्मान करण्यात आला. भारतीय संविधानाची प्रत, सन्मानचिन्ह व शाल देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसंगी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, माजी मंत्री रमेश बागवे, माजी नगरसेविका लता राजगुरू, सुजित यादव यांच्यासह मुख्य समन्वयक विठ्ठल गायकवाड आदी उपस्थित होते.

## मॅटर एरा आता आपल्या नम्मा बेंगालुरूमध्ये लाँच

**बंगळुरू (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची टेक्नॉलॉजी इनोव्हेशन कंपनी असलेल्या मॅटरने आपली फ्लॅगशिप गियर्ड इलेक्ट्रिक बाईक – एरा – भारताच्या इनोव्हेशन कॅपिटल, बंगळुरूमध्ये अधिकृतपणे लाँच केली आहे. मॅटरच्या वर्ल्ड-क्लास मॅन्युफॅक्चरिंग हबच्या यशस्वी उद्घाटनानंतर हे पाऊल उचलण्यात आले असून, भारतभरात मोबिलिटीमध्ये बदल घडवण्याच्या आणि मार्केट विस्ताराच्या त्यांच्या संकल्पनेचा हा आरंभ आहे. मॅटर एरा आता प्री-रजिस्ट्रेशन शो-रूम किंमतीत 1.88 लाखांपासून उपलब्ध आहे. लिमिटेड टाईम लाँच ऑफर अंतर्गत, बंगळुरूमधील पहिल्या 500 रायडर्ससाठी एरा ही गियर्ड इलेक्ट्रिक बाईक फक्त 1.79 लाखांपासून मिळणार आहे, त्यात 15,000 किमतीची लाइफटाईम बॅटरी वॉरंटी मोफत मिळणार आहे. मॅटरकडून त्यांच्या सुरुवातीच्या विश्वासू ग्राहकांसाठी उचललेले एक मोठे पाऊल आहे. आपला ब्रँड लोकांपर्यंत अधिक पोहोचविण्यासाठी, मॅटर लवकरच बीटीएम लेआऊट( सेकंड फेज, वैश्य बँक कॉलनीजवळ, 100फिट रोड) येथे आपला पहिला एक्सपेरियन्स हब सुरू करणार आहे. या आकर्षक ठिकाणी ग्राहकांना एरा बाईक प्रत्यक्षात पाहता आणि टेस्ट रायड घेता येईल व मॅटरची फिलॉसॉफी जवळून अनुभवता येईल. "या नव्या वाटचालीसाठी बंगळुरूपेक्षा चांगले शहर असूच शकत नाही—इथे इनोव्हेशन ही फक्त कल्पना नाही, तर जगण्याचा एक मार्ग आहे. येथील प्रत्येक गल्ली, प्रत्येक रायडर यामध्ये प्रोग्रेस आणि पर्पज झळकत असतो. एरा ही केवळ एक बाईक नाही तर ती 22व्या शतकाची मोटरबाईक आहे. ही बाईक रॉकेटसारखी थ्रिल देते आणि किंमत देखील खिशाला परवडणारी आहे. आमच्या इन-हाऊस डेव्हलप केलेल्या हायपरशिफ्ट मॅन्युअल गिअरबॉक्स, लिक्विड-कूल्ड पॉवरट्रेन आणि कनेक्टेड टेक्नॉलॉजिच्या जोरावर कधीही न अनुभवलेल्या पद्धतीने एरा बाईक - परफॉर्मन्स, इमोशन्स आणि सस्टेनेबिलिटीला एकत्र आणते," असे मॅटरचे संस्थापक आणि ग्रुप सीईओ, मोहल लालभाई यांनी या वेळी सांगितले. बुकिंग्स आता https://www.matter.in/ येथे सुरू असून, लवकरच बीटीएम लेआऊट( सेकंड फेज, वैश्य बँक कॉलनीजवळ, 100फिट रोड) येथील एक्सपेरियन्स हब मध्येही उपलब्ध होणार आहेत आणि डिलिव्हरी लवकरच सुरू होणार आहे.







# थोडक्यात

## हवेली तालुक्यातील सरपंच आरक्षण सोडत होणार जाहीर



लोणी काळभोर (आरंभ पर्व) : हवेली तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींपैकी आगळंबे,निरगुडी,वडगाव शिंदे,फुलगाव,कल्याण या ५ ग्रामपंचायत वगळून एकूण ६६ ग्रामपंचायत मधील सरपंचपदासाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दिनांक २३ रोजी गणेश कला क्रीडा मंच स्वारगेट येथे दुपारी १२ वाजता होणार आहे. दि. ५ मार्च २०२५ ते दि. ४ मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी ही सोडत होणार आहे. जनतेमधून सरपंच निवड असल्याकारणाने गावोगावी अनेक नेतेमंडळी सामाजिक कार्यक्रमात आघाडीवर दिसत असून जनतेने आपल्यालाच कौल द्यावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करताना दिसत आहेत. त्याच अनुषंगाने आरक्षण सोडतीत नक्की कोणाला सरपंच पदासाठी लढता येईल याचे चित्र स्पष्ट होणार असल्याने इच्छुकांची धाकधूक वाढलेली दिसत आहे.यावर्षी निवडणूक असल्याने अनेक इच्छुक उमेदवार गावात भेटीगाठी देत असून दशक्रिया विधी हा प्रमोशनचे स्थान झाल्याचे पाहण्यास मिळत आहे.श्रद्धांजली वाहण्याच्या नावाखाली आपले नाव कसे चर्चेत राहील किंवा आपण कसे प्रत्येकासाठी हजर असतो हे दाखविण्याचा प्रयत्न सुरू आहे.तसेच चौकाचौकात सध्या आरक्षण कोणते मिळू शकते यावर बैठका होऊ लागलेल्या आहेत.अनुभवी गावपुढाऱ्यांनी आपल्या अनुभवाची ताकद लावून मी सांगतो याच प्रवर्गाचे आरक्षण मिळते का नाही पहा यावर पैंजी लावलेल्या पाहण्यास मिळत आहे. तसेच काही ठिकाणी कोणते आरक्षण आले तर कोणता उमेदवार द्यायचा समोरच्याचा कोणता उमेदवार असेल त्याला आपल्याकडे कसा खेचायचा याचे नियोजन पॅनल प्रमुख करताना दिसत आहे.

पुढील गावांच्या सोडती होणार जाहीर : खानापूर, गोगलवाडी, अहिर, खामगांव मावळ, मालखेड, गो-हे बु., शिवापूर, मणेरवाडी, श्रीरामनगर, मांडवी बु., कुडजे, कोंढणपुर, खेडशिवापूर, गाउडदरा, आर्वी, आंबी, जांभळी, गोहे खुर्द, डोणजे, सोनापूर, मांजरी खुर्द, बहुली, मॉंडवीखुर्द, घेरासिंहगड, वरदाडे, सांगरुण, रहाटवडे, खडकवाडी, वडकी, उरुळीकांचन, कदमवाकवस्ती, लोणीकाळभोर, थेऊर, लोणीकंद, सोरतापवाडी, कुंजीरवाडी, कोरेगावमुळ, कोलवडी साष्टे, आव्हाळवाडी, केसनंद, वाडेबोल्हाई, हिंगणगाव, आळंदी म्हातोबाची, अष्टापुर, वढु खुर्द, शिंदवणे, बकोरी, पेठ, डोंगरगाव, तुळापूर, भावडी, न्हावी सांडस, तरडे, बुर्केगाव प्रयागधाम, वळती, शिरसवाडी, भिवरी, सांगवी सांडस, भवरापूर, पिंपरी सांडस, शिंदेवाडी, खामगाव टेक, टिळेकरवाडी, नायगाव व पेरणे.

## ऊस ऊत्पादक संघाच्या राज्यसंचालकपदी साहेबराव खामकर यांची निवड

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : शेतकऱ्यांचे ऊस उत्पादन वाढीसाठी सदैव कार्य करणारे संपूर्ण राज्याचे कार्यक्षेत्र असलेल्या महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाच्या राज्य संचालकपदी नुकतीच नवदीप सोशल फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष व साखर उद्योगाचे अभ्यासक साहेबराव खामकर यांची निवड करण्यात आली.संघा मार्फत ऊस उत्पादकता वाढीच्या दृष्टीने शेतक-यांना नियमित मार्गदर्शन केले जाते.खामकर यांचा साखर कारखान्यातील अनुभव व अभ्यास लक्षात घेऊन त्यांची राज्य संचालक पदी निवड केल्याचे संघाचे संस्थापक अध्यक्ष अतुल माने यांनी सांगितले. संघा मार्फत एकरी १०० टन ऊस उत्पादन अभियान,महाराष्ट्र ऊस भूषण कार्यगौरव पुरस्कार,जमीनआरोग्य व्यवस्थापन, मशागत ,बेणे लागवड , बेणे प्रक्रिया,आंतरपीक व्यवस्थापन,खत व्यवस्थापन, ठिबक सिंचन,ऊस तोडणी व्यवस्थापन अशा विविध विषयांवर राज्यातील वेगवेगळ्या भागात उपक्रम राबविण्यात येतात.ऊस हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे नगदी पीक असून या पिकामुळे राज्याची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती होण्यास मदत झाली आहे. शेतक-यांचे ऊज्वल भविष्या साठी ऊस पीकाची ऊत्पादकता वाढविणे गरजेचे असल्याने संघ प्रयत्नशील आहे व या करीता खामकर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरणार असल्याचे माने पुढे म्हणाले.आपल्या अनुभवाचा जास्तीत जास्त फायदा शेतक-यांना होणेच्या दृष्टीने नेहमीच प्रयत्नशील रहाणार असल्याचे खामकर यांनी या निवडी नंतर सांगितले.

# सेल्विन ट्रेडर्सने 'माजघर' केले लाँच : पाककृती उत्क्रांतीचा एक नवीन अध्याय

## एका वर्षात १२ आउटलेट उघडण्याची कंपनीची योजना




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

एसडीएफच्या सहकार्याने सेल्विन ट्रेडर्स लि.ने भारताच्या पाककृती किरकोळ लँडस्केपचे रूपांतर करण्याच्या धाडसी पावलाने, अहमदाबाद येथील सन एन स्टेप क्लब, सतधार,चार रास्ता, मेमनगर, सोला रोड, येथे 'माजघर' या ब्रँड नावाने पहिल्या घरगुती दुकानाची सुरूवात केली आहे. ही सुरूवात म्हणजे माजघरच्या महत्वाकांक्षी राष्ट्रीय विस्ताराची सुरूवात आहे.

आधुनिक किरकोळ लेन्सद्वारे प्रादेशिक स्वाद पुनरुज्जीवित करण्याच्या दृष्टीने, सेलविन ट्रेडर्स लि. फ्रँचायझी मॉडेल अंतर्गत पुढील १२ महिन्यांत देशातील १२ मोठ्या शहरांमध्ये १२ नवीन आउटलेट उघडण्याची योजना आखत आहे. यासाठी १५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून त्यातून २३.५ कोटी रुपयांचा महसूल तयार होणार आहे. यामुळे उच्च-गुणवत्तेच्या खाद्य उत्पादनांच्या वाढत्या मागणीमुळे समृध्द वारसा चालविला जातो.

माजघराने समकालीन स्वभावासह भारताच्या पारंपरिक स्वयंपाकघरांचे सार एकत्र केले आहे. आउटलेटमध्ये तांदूळ, डाळी, वाळलेले पदार्थ, ग्लूटेन-फ्री उत्पादने, मसाले, पापड्स, मसाला चहा, मुखवास आणि जामुन हनीसारख्या अनोख्या गॉरमेट ऑफरचे उत्कृष्ट वर्गीकरण आहे. आधुनिक ग्राहकांच्या विकसनशील अभिरुचीनुसार भाग घेताना प्रत्येक उत्पादन भारताच्या पाककृतीच्या मुळाशी खोल कनेक्शन प्रतिबिंबित करते. त्याच्या घरगुती वाढीच्या समांतर एसडीएफ आणि सेलविन ट्रेडर्स लि. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर आपली दृष्टी निश्चित करीत आहे. कंपन्या त्यांचे निर्यात नेटवर्क मिडल ईस्ट, आफ्रिका, युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि रशियासह आदी क्षेत्रांमध्ये सक्रियपणे विस्तार करीत आहेत. त्यांच्या जागतिक पोर्टफोलिओमध्ये ताज्या भाज्या, प्रक्रिया केलेले पदार्थ, तृणधान्ये, आंबा लगदा आणि सल्फर-कमी गूळ यांची क्युरेट केलेली निवड आहे. सर्व शुद्धता, पोषण आणि पारंपरिक भारतीय चव यावर केंद्रित आहे.

प्रीमियम भारतीय आंबे, विशेषत: अल्फान्सो आणि गिर केसर यावर विशेष भर देण्यात आला असून, जे वाढत्या जागतिक मागणीची पूर्तता करण्यासाठी प्रक्रिया केलेल्या लगदा स्वरूपात निर्यात केली जात आहेत. अल्फान्सो त्याच्या उच्च, गोडपणासाठी ओळखला जातो, तर गिर केसर-गुजरातमधील आंब्यांचा राजा म्हणून सेन्लेब्रेटेड-एक सोनेरी रंग आणि केशरसारखी त्याची चव आहे. कोकण किनारपट्टी आणि गिर जंगलात वाढलेले हे वाण भारतीय फळांच्या उत्कृष्टतेचे प्रमाण आहे.

या विस्ताराच्या मध्यभागी शेतकरी हा एक प्रथम दृष्टिकोन आहे. भारतीय शेतकऱ्यांकडून थेट सोर्सिंग करून, ग्रामीण समुदायांचे सबलीकरण करताना ग्राहकांसाठी प्रीमियम गुणवत्ता सुनिश्चित करण्याचे एसडीएफ आणि सेलविनचे लक्ष्य आहे. हे फार्म-टू-मार्केट मॉडेल नैतिक सोर्सिंग, वाजवी व्यापार आणि उत्पादकांसाठी उच्च उत्पन्नास प्रोत्साहित करते, ज्यामुळे राहणीमान आणि दीर्घकालीन टिकाव सुधारित करते.

भारत सरकारच्या कृषी निर्यात धोरणाशी संरेखित करण्यासाठी कंपन्या काम करत असून क्लस्टर विकास कार्यक्रमांतर्गत एपीईडीएशी सक्रियपणे सहकार्य करीत आहेत. सध्याच्या निर्यातीत नागपूरची संत्री, रत्नागिरीचे अल्फान्सो आंबे, केळी, ब्लॅकबेरी आणि हळद यांचा समावेश आहे, जे मुख्य बाजारपेठेत आंतरराष्ट्रीय ग्राहकांपर्यंत पोहोचतात.

अंदाजे वार्षिक ५० कोटींच्या महसुलावर लक्ष ठेवण्यात आले असून एसडीएफ आणि सेलविन ट्रेडर्स लि. यांच्यातील भागीदारी ही भारताच्या वाढत्या अन्न निर्यात आणि किरकोळ क्षेत्रातील एक प्रमुख प्लेअर होण्याची तयारी आहे. आधुनिक किरकोळ अनुभवांसह पारंपरिक भारतीय चव कमी करून, माजघर हे केवळ एक स्टोअर नाही तर ही सांस्कृतिक आणि पाककृती चळवळीची सुरुवात आहे.

१९ जुलै, २०२४ रोजी, सेल्विन बोर्डाने एसडीएफ प्रॉडक्शन प्रायव्हेटमध्ये ५१ टक्के हिस्सा मिळविण्यास मान्यता दिली. या मर्यादीत धोरणात्मक गुंतवणुकीचे उद्दीष्ट सेल्विन ट्रेडर्स लि.चा व्यवसाय बाजारातील वाढ, पुरवठा साखळी एकत्रीकरण आणि महसूल वाढविणे हे आहे. अलीकडेच, एसडीएफ प्रॉडक्शन्स (सेल्विन ट्रेडर्स लि.ची उपकंपनी) यांनी अल्फान्सो आंबा,केसर आंबा इत्यादींच्या अनेक ऑर्डर मिळविल्या, ज्यात १.१६ दशलक्ष घ्या आयुष्या ग्लोबल एफजेडसी एलएलसी यांच्याकडून युएसडी १.२० दशलक्ष ऑर्डर , राजेश ग्लोबल जीएमबीएच आणि यूएसडी १.१५ दशलक्ष यूएसडीची शिंग एक्झिम जनरल ट्रेडिंग एलएलसी कडून ऑर्डर आहे. एसडीएफ प्रॉडक्शन्स व्यवस्थापनाकडून ३५ ते ४० टक्के मार्जिनसह सेल्विनला ३० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल अपेक्षित आहे.

## ४६ वर्षानंतर एकत्र येत भरला स्नेहमेळावा



**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

वाफगाव (ता.खेड) येथील रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा यशवंतराव होळकर विद्यालयातील १९७९ सालच्या दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी तब्बल ४६ वर्षानंतर एकत्र येत स्नेहमेळावा राजगुरूनगर येथे आयोजित केला होता . इतक्या वर्षांनी सर्व विद्यार्थी एकत्र भेटल्यावर सर्वांनी आनंद व्यक्त केला. या मेळाव्याला त्यावेळचे शिक्षक तानाजी चन्ने व आनंद यादव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन त्यावेळचे विद्यार्थी समाजभूषण व ज्येष्ठ पत्रकार कैलास गायकवाड, जेष्ठ साहित्यिक शंकर नऱ्हे, शामराव थिटे, प्रा. सुरेश रणपिसे, प्रा. विलास पोखरकर, सोपान शिंदे, नंदू वाडेकर, विकास कालेकर यांनी केले. सुना, नातवंडे आलेल्या विद्यार्थ्यांनी यावेळी शाळेतील गमती-जमती सांगत आपापल्या जीवनाचा प्रवास उलगडला . तसेच आता वृद्धापकाळात कसे वागावे याचेही धडे गिरवले. सपत्नीक आलेल्या या विद्यार्थ्यांचा शिक्षकांच्या हस्ते स्मृतिचिन्हे देऊन सन्मान करण्यात आला.

## उरुळी कांचन पोलीस स्टेशन अंतर्गत वाचन कट्टा सुरू - शंकर पाटील

**सचिन सुंबे**



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

उरुळी कांचन (ता. हवेली) येथील उरुळी कांचन पोलीस स्टेशन अंतर्गत वाचन कट्टा सुरू करण्यात आला असून अतिशय चांगला प्रतिसाद या वाचन कट्ट्याला मिळत आहे. पुस्तक हे आपले एक चांगले मित्र असून मोबाईलच्या दुनियेमध्ये पुस्तके जवळ करा, वाचाल तर वाचाल असे मत उरुळी कांचनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी आपले मत व्यक्त केले. वाचक वर्गाने या उपक्रमाचे स्वागत केले असून अनेक चांगली पुस्तके त्या ठिकाणी वाचायला मिळत आहे. हा एक वेगळा आनंद मिळत आहे. नाशिकचे शिव समर्थ प्रकाशनचे अंकुर काळे आणि इतिहास अभ्यासक खलील उर्फ मुन्नाभाई शेख यांनी या उपक्रमाला पुस्तके भेट देऊन एक चांगला आदर्श घडवला आहे.

महाराणा प्रताप, संभवामी युगे युगे, गड किल्ल्यांच्या माहितीचे दुर्ग, अपेक्षित दुर्गांचा इतिहास, गाव कुसातील जितराब, गरुड झेप, औदुंबरावत, अशी अनेक पुस्तके त्यांनी भेट दिली. याप्रसंगी पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय बारामती, पोलिस कॉंस्टेंबल राजकुमार भिसे, ऋषीकेश रासकर, एस . चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक सीद पाटील गुन्हे अन्वेषण, पोलीस हवालदार शैलेश स्वामी, विशाल शिंदे, आदेश पोवार, ओंकार कांचन आदी मान्यवर व वाचक वर्ग उपस्थित होते.

# पारनेर राजकीय कुस्त्या लावण्यासाठी माहीर : डॉ. सुजय विखे

## बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशनच्या आखाड्याचा जिल्ह्यात नावलौकिक



**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

अंबिका माता यात्रा उत्सवा निमित्ताने माजी सभापती बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशन यांच्या वतीने मॉडेल व्हिलेज गोरेगाव येथे भव्य दिव्य अशा कुस्तीचा जंगी आखाडा व मैदान काल पार पडले. पै. कोंडीबा भाऊ तांबे यांच्या हस्ते आणि सबाजीराव देठे,शिवाजीराव शेरकर यांच्या उपस्थितीत मैदान पूजन करण्यात आले. माजी सभापती बाबासाहेब तांबे यांनी सबंध आखाड्याची पार्श्वभूमी आणि रचना जाहीर केल्यानंतर आखाड्याला प्रत्यक्ष सुरुवात झाली.

या कुस्ती मैदानाला अनेक राजकीय दिग्गजांनी उपस्थिती दर्शवली होती. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी माजी सभापती बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशन च्या आखाड्याचा जिल्ह्यात नावलौकिक आहे असे गौरउद्गार काढले. पारनेर तालुका राजकीय कुस्त्या लावण्यासाठी देखील माहीर आहे, असा टोला देखील त्यांनी लगावला.

मा.सभापती बाबासाहेब तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या आखाड्याला ते नेहमी प्रेमाने बोलावतात. आम्ही देखील नेहमी त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहतो. अतिशय उत्कृष्ट नियोजन, सूत्रबद्ध चालणारा कार्यक्रम, आणि शिस्त प्रामुख्याने सोशल फाउंडेशनच्या प्रत्येक कार्यक्रमात दिसते. यासाठी सर्व सदस्यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.


पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी देखील कुस्ती मैदानाचे कौतुक करताना जि.प. माजी सभापती बाबासाहेब तांबे यांचा भव्य दिव्य कार्यक्रमात हातखंडा आहे. कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी गोरेगाव संपूर्ण तालुक्याला नव्हे जिल्ह्याला एक आदर्श आहे असे मत व्यक्त केले.

# कॉनरॅड पुणे लाँच करणार कॉनरीड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील आघाडीचे लक्झरी डेस्टिनेशन कॉनरॅड, पुणे आता कॉनरीड या त्यांच्या खास मालिकेच्या माध्यमातून शहराच्या सांस्कृतिक इतिहासात एक नवा अध्याय लिहिण्यास सज्ज आहे. मासिक (महिन्यातून एकदा) उपक्रम असलेल्या कॉनरीडच्या माध्यमातून लेखक, विचारवंत आणि वाचनप्रेमी एकत्र येऊन कथा, कल्पना आणि विचारांची देवाणघेवाण करू शकतील. वर्ल्ड बुक डेच्या पूर्वसंध्येला म्हणजेच 21 एप्रिल रोजी ही संकल्पना सुरू होत असून, कॉनरीडचा उद्देश असा एक समुदाय उभा करणे आहे, ज्यांना पुस्तकांच्या पानांमध्ये आनंद आणि संवादांमध्ये अर्थ सापडतो.

लेखकांनी लिहिलेल्या प्रत्येक शब्दाचा सन्मान करण्यासाठी बनविण्यात आलेल्या या मालिकेमध्ये पुणेकरांना दर महिन्याला एकत्र येत खास वातावरणात आपल्या आवडत्या लेखकांशी अगदी जवळून भेटण्याची संधी मिळणार आहे. कॉनरॅड पुणेच्या "संस्कृती आणि आतिथ्य" या तत्वज्ञानाचा विस्तार म्हणून साकारलेले कॉनरीड ही एक चळवळ





आहे जेथे बौद्धिक चर्चांना प्रोत्साहन मिळेल, नव्या पब्लिशिंग ट्रेंडचा शोध घेतला जाईल आणि ख्यातनाम लेखकांशी विशेष संवाद साधता येईल. साहित्य असो, अर्थशास्त्र असो की प्रत्यक्ष जीवनाचे अनुभव – कॉनरीड हा एक असा डायनॅमिक प्लॅटफॉर्म ठरेल जिथे कल्पनांना केंद्रस्थानी ठेवले जाईल.

या मालिकेच्या पहिल्या पर्वात सहभागी होणार आहेत प्रसिद्ध आणि बेस्ट सेलिंग पुस्तकांच्या लेखिका व शेअर मार्केट एक्स्पर्ट देविना मेहरा, ज्यांच्यासोबत संवाद साधतील मिंटच्या पर्सनल फायनान्स विभागाचे प्रमुख नील बोराटे. यामध्ये ते देविना मेहरा यांच्या नव्या पुस्तकावर चर्चा करतील – मनी, मिथ्स अँड मंत्राज – द अल्टिमेट इन्व्हेस्टमेंट गाईड. यानंतर प्रश्नोत्तराचे सत्र आणि बुक सायनिंग होईल – त्यामुळे वाचकांना आपल्या आवडत्या पुस्तकांच्या लेखकांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळेल.

या उपक्रमाबाबत बोलताना कॉनरॅड पुणेचे जनरल मॅनेजर, अभिषेक सहाय म्हणाले,"कॉनरीडच्या माध्यमातून आम्ही बौद्धिकतेचा, सखोल संवादांचा आणि समाजकेंद्रित नवा आलिशान अनुभव देण्यासाठी आमचे दालन उघडत आहोत. ही मालिका पुण्याच्या सांस्कृतिक वातावरणाप्रति आमचं योगदान आहे – जिथे वाचनप्रेमी आणि विचारवंत एकत्र येतील, चर्चा करतील, नव्या कल्पनांना चालना देतील आणि प्रेरित राहतील. देविना मेहरासारख्या दिग्गज व्यक्तिमत्त्वासोबत ही सुरुवात करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे आणि पुढील अनेक अध्यायांची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत."

कॉनरीडचा भाग होण्याबाबत लेखिका देविना मेहरा म्हणाल्या, "कॉनरॅड पुणे येथे कॉनरीडच्या पहिल्या पर्वाचा भाग होताना मला अतिशय आनंद होत आहे. माझ्या दोन अत्यंत आवडत्या गोष्टी – पुस्तके आणि गुंतवणूक/फायनान्स – यांचे कॉम्बिनेशन, तेही उबदार, खुल्या आणि खऱ्या अर्थाने जिज्ञासू वातावरणात होणं, ही एक उत्तम गोष्ट आहे. मला खात्री आहे की ही संध्याकाळ अगदी अशीच संस्मरणीय ठरेल. पुस्तकं, प्रश्न आणि जीवनाचे खरे अनुभव मोकळेपणाने मांडण्यासाठी एक हक्काची जागा निर्माण केल्याबद्दल मी कॉनरॅड पुणेची आभारी आहे. माझ्या आजवरच्या प्रवासाला आणि सखोल अनुभवांना सर्वांसोबत शेअर करण्याची मी वाट पाहते आहे."

कॉनरॅड पुणेच्या सुंदर आणि उठावदार पार्श्वभूमीवर सजलेली ही 'कॉनरीड'ची प्रत्येक आवृत्ती, साहित्य शोधाचे आकर्षण आणि कॉनरॅडच्या खास आतिथ्यशीलतेची उब एकत्र आणेल. ही अशी अनुभवात्मक क्षणांची मालिका असेल जी विचारांना चालना देणारी आणि मनाला कायम लक्षात राहणारी असेल. ही एक अशी समाज निर्मिती आहे जिथे पुस्तकप्रेमींच्या प्रेमाला त्यांच्या सारख्याच व्यक्तींपर्यंत पोहोचवतं.






दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

# १५० वर्षे नाबाद : बॉम्बे वायएमसीएची समाजसेवा आणि क्रीडाक्षेत्रातील समृद्ध परंपरा!

## एनसीपीए येथे २५ एप्रिलला होणाऱ्या कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि वायएमसीएच्या जागतिक अध्यक्षा सोहेला हायेक यांची प्रमुख उपस्थिती

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

बॉम्बे वायएमसीए (यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशन) ही नामांकित संस्था समुदायाचे सशक्तीकरण, जीवनाचे रुपांतरण तसेच सेवा, क्रीडा आणि सामाजिक बदल या क्षेत्रांमध्ये १८७५पासून निरंतर कार्यरत आहे. या संस्थेचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षपूर्ती होत आहे. दीडशेव्या वर्धापन दिनाचा हा ऐतिहासिक कार्यक्रम शुक्रवार, दिनांक २५ एप्रिल, २०२५ या दिवशी जमशेद भाभा थिएटर, एनसीपीए, नरिमन पॉइंट, मुंबई येथे साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे प्रमुख पाहुणे आणि वायएमसीएच्या जागतिक अध्यक्षा सोहेला हायेक हे सन्माननीय अतिथी म्हणून म्हणून उपस्थित राहणार आहेत. याशिवाय जागतिक वायएमसीए मोहिमेतील अनेक नामवंत, राष्ट्रीय स्तरावरील नावाजलेल्या व्यक्ती, भागधारक आणि शुभेच्छुक या कार्यक्रमाला हजेरी लावतील, अशी माहिती बॉम्बे वायएमसीएचे अध्यक्ष नोएल अमन्ना यांनी दिली.

"मुंबईसारख्या धकाधकीच्या शहरात सामाजिक भान बाळगून दीडशे वर्षे अथक सेवा करण्याचे कार्य बॉम्बे वायएमसीएने केले आहे. क्रीडा क्षेत्रातील पाठबळ आणि युवकांच्या वसतिगृहांची मुहूर्तमेढ रोवण्यापासून ते सर्वसमावेशक जागा, निवारे आणि शैक्षणिक उपक्रम उभारण्यापर्यंतचे संस्मरणीय कार्य संस्था करीत आली आहे. केवळ कसोटीच्या कालखंडातच नव्हे, तर पिढ्यान्पिढ्या मुंबईकरांच्या जडणघडणीतही संस्थाने मोलाची भूमिका बजावली आहे," असे बॉम्बे वायएमसीएचे सरचिटणीस ऑलिन कोटियन यांनी सांगितले.

बॉम्बे वायएमसीएची स्थापना २५ एप्रिल, १८७५ या दिवशी धोबी तलावच्या फ्रामजी कावसजी हॉलमध्ये झाली. आधुनिकतेच्या उंबरठ्यावरील वसाहती शहरातील तरुणांच्या आध्यात्मिक आणि लौकीक गरजा पूर्ण करणे हा संस्थेचा प्राथमिक उद्देश होता. नियमित प्रार्थना करणाऱ्या १८८ जणांच्या समूहाने ही संस्था सुरू केली. यात २० भारतीयांचा समावेश होता. अगदी प्रारंभीच्या दिवसांतही सर्वसमावेशकता आणि श्रद्धेच्या मूल्यांचे प्रतिबिंब संस्थेच्या कार्यात दिसून येत होते. भारतीय बास्केटबॉलच्या वाटचालीत वायएमसीएचा सिंहाचा वाटा आहे, हे सर्वश्रुत आहे. वायएमसीएचे मार्गदर्शक जेम्स नॅस्मिथ यांनी अमेरिकेत या खेळाचा शोध लावला. मुंबईत त्यावेळी संघटनेने ही क्रीडात्मक मशाल सदैव धगधगत ठेवली. कालांतराने फुटबॉल, टेबल टेनिस, जिम्नॅस्टिक्स आणि नंतरच्या काळात जलतरण आणि बिलियर्ड्स या क्रीडा प्रकारांकडेही विशेष लक्ष पुरवले.

बॉम्बे वायएमसीएने १९१४मध्ये आपला शारीरिक शिक्षण विभाग सुरू केला आणि १९२४च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचा पहिला ऑलिम्पिक चमू धाडण्याच्या मोहिमेत महत्त्वाचे योगदान दिले. वायएमसीएने पहिले वसतिगृह (हॉस्टेल) १८९०मध्ये सुरू केले. युवा नोकरदार पुरुषांसाठी परवडणाऱ्या किंमतीत सुरक्षित निवासव्यवस्था पुरवण्यात आली. आजमितीला वायएमसीएच्या साखळीतील वसतिगृहे ही शहरातील विद्यार्थी, व्यावसायिक आणि उदयोन्मुखांसाठी आश्रयस्थाने आहेत. १९७२मध्ये बॉम्बे वायएमसीएच्या मुख्यालयाचे अपोला बंदर येथून वायएमसीए इंटरनॅशनल हाऊस, मुंबई सेंट्रल येथे स्थलांतर झाले. या प्रशस्त जागेत निवास व्यवस्था, प्रशिक्षक केंद्र आणि समुदायाचे कार्यक्रम करण्याची क्षमता होती. त्यानंतर 'शरण' हा नवा उपक्रम वायएमसीएने राबवला. मुंबई महानगरपालिकेच्या साहाय्याने अंधेरीमधील साकीनाका परिसरात ३२ खाटांची तात्पुरती निवास व्यवस्था उभी केली. शहरातील विकासकार्याच्या पलीकडे लोणावळानजीक कान्हे येथे एक प्रेरणादायी ग्रामीण उपक्रमसुद्धा संस्थेकडून राबवला जात आहे. हे व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र आसपासच्या गावांमधील तरुण आणि महिलांसाठी जीवनरेखा बनले आहे.

"बॉम्बे वायएमसीएची दीडशे वर्षांची वाटचाल ही प्रार्थना, श्रद्धेची ताकद, समर्पण, सेवा आणि समुदाय यांची साक्षीदार आहे. १८७५ साली स्थापन झाल्यापासून आजपर्यंत आम्ही युवकांचा सर्वांगीण विकास, कुटुंबांचे सशक्तीकरण, सामाजिक परिवर्तन घडविणे आणि अधिक समावेशक व समताधारित समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. या ऐतिहासिक टप्प्याचा उत्सव साजरा करताना, आम्ही आमच्या ध्येयाशी नव्याने बांधिलकी व्यक्त करतो. समर्थ व्यक्तिमत्व, समर्थ कुटुंबे आणि समर्थ समुदाय घडविण्यासाठी आम्ही कार्यरत आहोत. हे वर्ष केवळ आमच्या भूतकाळाचा उत्सव नसून वर्तमानातील बांधिलकी आणि भविष्याची आश्वासक प्रतिज्ञा आहे."

## स्वारगेट अत्याचार प्रकरणात अजय मिसार विशेष सरकारी वकील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात राज्य सरकारने ॲड. अजय मिसार यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे.

स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये २६ फेब्रुवारी रोजी पहाटे एका तरुणीवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली होती. या प्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी आरोपी दत्तात्रेय रामदास गाडे याला अटक करण्यात आली होती.

या गंभीर गुन्ह्याच्या खटल्यांमध्ये प्रभावी न्यायप्रक्रिया पार पाडण्यासाठी ॲड. अजय मिसार यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश सोमवारी (ता. २१) काढण्यात आला. या प्रकरणाची सुनावणी पुण्यातील शिवाजीनगर सत्र न्यायालयात होणार आहे.

## काजोल आणि सारा अली खान पासून वेदांग रैना आणि वीरपहारिया पर्यंत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वेलनेस कॅलेंडरमधील सर्वात आनंदी आणि उच्चभ्रू कार्यक्रम, ग्लोबल स्पा अवॉर्ड्स, मुंबईत संपन्न झाला. या कार्यक्रमात स्पा, वेलनेस आणि हॉस्पिटॅलिटी उद्योगातील प्रमुख नेते एकत्र आले होते. या सायंकाळात बॉलिवूड, टेलिव्हिजन आणि फॅशन जगतातील नामवंत सेलिब्रिटींचेही स्वागत करण्यात आले, ज्यामुळे याला ग्लॅमर आणि लोकप्रियतेचा तडका मिळाला. आता सातव्या पर्वात, ग्लोबल स्पा अवॉर्ड्सचे प्राथमिक उद्दिष्ट उत्कृष्ट मानकांचे समर्थन करणे




आणि स्पा प्रेमी आणि उच्च-स्तरीय वेलनेस संस्था यांच्यात अधिक सखोल संबंध वाढवणे आहे.

ग्लोबल स्पा इंडिया आणि मध्य पूर्वच्या मुख्य संपादक परिणीता सेठी म्हणाल्या, "ग्लोबल स्पा अवॉर्ड्समध्ये, आमचे ध्येय अशा व्यक्ती आणि संस्थांना ओळखणे आणि त्यांचा सन्मान करणे आहे जे वेलनेसच्या मानकांना सतत उंच करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. हे पुरस्कार त्यांचे समर्पण, निष्ठा आणि नवोन्मेष यांना आदरांजली आहेत."

भव्य सोफी चौधरी आणि विनोदी कलाकार नितीन मिराणी यांनी आयोजित केलेल्या यावर्षीच्या शानदार सोहळ्यात रेखा, काजोल, सारा अली खान, वेदांग रैना, मलायका अरोरा, रकुल प्रीत सिंह, सोनाली बेंद्रे, नितंशी गोयल, अविनाश तिवारी, प्रतिभा रांटा, वीर पहारिया, जॅस्मिन भसीन आणि इतर अनेक ए-लिस्ट सेलिब्रिटींनी हजेरी लावली. रेड कार्पेटवरील त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला एक असाधारण चमक मिळाली. या कलाकारांनी केवळ ग्लिट्झ आणि ग्लॅमरच नव्हे, तर सर्वोत्कृष्ट डेस्टिनेशन स्पा, सर्वोत्कृष्ट सलून, सर्वोत्कृष्ट ब्यूटी ब्रँड, सर्वोत्कृष्ट हॉटेल स्पा आणि इतर विविध श्रेणींमध्ये पुरस्कार सादर करणारे आणि स्वीकारणारे म्हणूनही भूमिका बजावली. यावर्षीच्या कार्यक्रमात विस्तारित पर्याय, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, टिकाऊपणा आणि संवर्धन वेलनेस उपक्रम आणि समावेशकतेच्या बांधिलकीमुळे मानके अधिक उंच झाली, ज्यात प्रसिद्ध सेलिब्रिटींना वैशिष्ट्यीकृत करताना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या महत्त्वावर प्रकाश टाकण्यात आला. या सायंकाळात सारा अली खानसोबत रोहन श्रेष्ठ यांनी स्वित्झर्लंडमधील नयनरम्य इंटरलेकन येथे शूट केलेल्या ग्लोबल स्पाच्या नवीनतम मुखपृष्ठाचे अनावरण देखील झाले. भागीदार ब्रँड्सनी ग्लोबल स्पा अवॉर्ड्स २०२५ सोबतच्या यशस्वी सहकार्याचा अनुभव कथन केला. यावर्षी, समिरा हॅबिटॅट्स ग्लोबल स्पा अवॉर्ड्सचे प्रेझेंटिंग पार्टनर होते.

## कर्जमाफीपेक्षा शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर भर द्यावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याविषयी कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, वारंवार कर्जमाफीवर चर्चा करण्यापेक्षा शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे. त्यांच्या कृषी उत्पादनांना चांगला भाव देण्यासह कृषी उत्पादनावर प्रक्रिया, शेतीक्षेत्राला बिगरशेती क्षेत्राची जोड, कृषी व सहकार विभागातील समन्वय आणि सहकार व महसूल विभागाच्या समन्वयातून खरीप व रब्बी हंगामात १०० टक्के पीककर्ज उपलब्ध करून द्यावे," अशी मागणी शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा ज्योती विनायक मेटे यांनी केली.




पुण्यातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनात शिवसंग्राम पक्षाची राज्यस्तरीय बैठक पार पडली. त्यानंतर ज्योती मेटे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत माध्यमांशी संवाद साधला. प्रसंगी आदी उपस्थित होते.व प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश चिटणीस योगेश विचारे, पुणे शहराध्यक्ष भरत लगड, ज्येष्ठ पदाधिकारी शेखर पवार, वसंत पाटील, पी. के. चव्हाण यांच्यासह सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्योती मेटे म्हणाल्या, "आजच्या बैठकीत अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होऊनही स्मारकाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी तातडीने लक्ष देऊन मुंबई उच्च न्यायालय, तसेच सर्वोच्च न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडून स्मारकाचे कामकाज त्वरित सुरु करावे. छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक व स्मृतीस्थळ, तसेच पानिपत येथील मराठ्यांच्या शौर्य इतिहासाच्या प्रतिक असलेले स्मृतीस्थळ उभारणीसाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करते. स्वराज्य संकल्पक शहाजी महाराजांचे हौदेगिरी (दावणगिरी) कर्नाटक येथे स्मृतीस्थळ उभारणेबाबत कार्यवाही करावी."











